लोकमत सिंधुदुर्ग, गुरुवार, दि. १९ मार्च २०१५

**२६, २७ मार्च : दोडामार्ग महाविद्यालयात आयोजन**

# पश्चिम घाटाबाबत चर्चासत्र

**दोडामार्ग** : येथील नवनिर्माण महाविद्यालयात भारतीय सामाजिक अनुसंधान परिषद (आयसीएसएसआर) मुंबईच्यावतीने २६ व २७ मार्च रोजी 'पश्चिम घाट - जागतिक वारसा, पर्यावरण आणि विकास' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. युनेस्कोने अलिकडेच पश्चिम घाटाचे जागतिक पर्यावरणीयदृष्ट्या महत्त्व लक्षात घेऊन जागतिक वारसा यादीत पश्चिम घाटाचा समावेश केला आहे. या पार्श्वभूमीवर दक्षिण भारताच्या व महाराष्ट्राच्या विकासाच्यादृष्टीने पश्चिमघाटाचा कशाप्रकारे उपयोग करता येईल, याचा अभ्यास, चिंतन व मनन व्हावे, हा उद्देश समोर ठेवून चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

पश्चिम घाटासंदर्भात माधव गाडगीळ समिती व कस्तुरीरंगन समिती यांच्या बहुचर्चित अहवालावरही तज्ज्ञ आपली मते मांडणार आहेत. शिवाय पश्चिम घाटाचे पर्यावरण अबाधित ठेवून त्याचा सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने कसा लाभ घेता येईल, यावरही प्रामुख्याने चर्चा होणार आहे. या चर्चासत्रामध्ये पश्चिम घाटातील संपन्न जैवविविधता, वनौषधींचा विकास, जंगलांचा होत असलेला ऱ्हास, पारंपरिक उर्जा निर्मिती स्त्रोत, खाण व्यवसाय, धरणे, रस्ते आणि शेती क्षेत्राचा विकास, नवीन वसाहती, पर्यटन विकास, जल व्यवस्थापन आदी विषयांवर सखोल चर्चा होणार आहे. या चर्चासत्रामध्ये पालघर कॉलेजचे प्राचार्य डॉ. हेमंत पेडणेकर, मुंबई विद्यापीठाचे भूगोल विभागप्रमुख डॉ. अंबादास जाधव, चौगुले कौलेज गोवाचे भूगोल विभागप्रमुख डॉ. नंदकुमार सावंत, गोवा शासकीय कॉलेजचे भूगोल विभागप्रमुख डॉ. प्रवीणकुमार रथ, आरपीडी कॉलेज, बेळगावचे डॉ. अभय पाटील, नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे भूगोल अभ्यास मंडळाचे चेअरमन डॉ. एच. बीं. राठोड, कोल्हापूर शिवाजी विद्यापीठाचे भूगोल विभागप्रमुख डॉ. मीना पोद्दार, विश्वभारती विद्यापीठ, पश्चिम बंगालच्या डॉ. सुभाषित मंडल, सागर विज्ञान संस्था, गोवाचे मुख्य संशोधक डॉ. बबन इंगोले, एर्नाकुलम-केरळचे भूगोल विभागप्रमुख डॉ. सोनल कुमार, लातूर शहा महाविद्यालयाचे भूगोल विभागप्रमुख डॉ. ओमप्रकाश शहापूरकर आदी तज्ज्ञ मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे. यामध्ये अन्य राज्यातील १०० पेक्षा अधिक पर्यावरण अभ्यासकसहभागी होणार आहेत. चर्चासत्रामध्ये सहभाग नोंदणीसाठी प्रा. एस. एन. जाधव, प्रा. श्रीपाद पाडगावकर यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले आहे. (प्रतिनिधी)

## गोव्याच्या मुख्यमंत्र्यांची उपस्थिती

चर्चासत्राचा प्रारंभ गुरुवारी सकाळी १० वाजता गोव्याचे मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर यांच्या उपस्थितीत होणार आहेत. तर समारोप समारंभास २७ रोजी पर्यावरण चळवळीतील अग्रणी प्राचार्य डॉ. एम. आय. बाचूळकर उपस्थित राहणार आहेत. चर्चासत्राचे समन्वयक म्हणून प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे, सहसमन्वयक म्हणून प्रा. एस. एन. जाधव काम पाहणार आहेत.